# प्रजासत्ताक दिन भाषण मराठी

उजाडली आज प्रजासत्ताक दिनाची

मंगलमय प्रभात

देशभक्ती, देशप्रेम संचारले आज चराचरात

भारत मातेला वंदन करूनी

करतो मी माझ्या भाषणाला सुरुवात !!

आज येथे उपस्थित व्यासपीठावरील प्रमुख पाहुणे, माझे गुरुजन वर्ग आणि माझ्या बालमित्रांनो!! आज अभिमानाने फडकत असलेल्या या तिरंग्या झेंड्याला वंदन करून मी माझ्या भाषणाला सुरुवात करतो. आजच्या या शुभ मुहूर्तावर मी आपल्याला जे काही 2 शब्द सांगणार आहे ते आपण शांत चित्ताने ऐकावे अशी मी विनंती करतो.

मित्रांनो प्रथम आपल्याला प्रजासत्ताक दिणाच्या खूप खूप शुभेच्छा. आज 26 जानेवारी म्हणजेच आपला प्रजासत्ताक दिन. मित्रांनो आपल्या माहीत आहे का? की आपण प्रजासत्ताक दिन का साजरा करतो. आणि हा प्रजासत्ताक दिन 26 जानेवारीला च का साजरा करतो. आज मी आपल्याला प्रजासत्ताक दिनाचा इतिहास सांगणार आहे.

मित्रांनो आपला भारत देश 15 ऑगस्ट 1947 रोजी इंग्रजांच्या गुलामगिरीतून स्वतंत्र झाला. परंतु एक स्वतंत्र राष्ट्र म्हणून देश चालविण्यासाठी आपल्याकडे आपली स्वतःची राज्यघटना नव्हती. अशावेळी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली घटना समिती स्थापन करण्यात आली.

या समितीने 2 वर्षे 11 महिने 18 दिवस अथक परिश्रम करून भारत देशाला स्वतंत्र आणि मजबूत संविधान दिले.

26 जानेवारी 1950 रोजी आपल्या देशात हे संविधान लागू करण्यात आले. तेव्हा आपला भारत देश सार्वभौम, लोकशाही, प्रजासत्ताक देश बनला. आपली राज्यघटना ही जगातील सर्वात मोठी लिखित राज्यघटना आहे. या घटनेने आपल्याला आपले मूलभूत हक्क आणि अधिकार दिले आहे.

मित्रांनो आपला भारत देश स्वतंत्र होणे आणि प्रजासत्ताक राष्ट्र होणे हे इतके सोपे नव्हते. आपल्या भारत देशाला स्वतंत्र करण्यासाठी अनेक शूर स्वतंत्र वीरांनी आपले

अवघे आयुष्य वाहून घेतले. काही वीरांनी तर आपल्या आयुष्याचे बलिदान दिले आहे. जसे की, वीर भगतसिंग, राजगुरू, सुखदेव, चंद्रशेखर आझाद, सुभाषचंद्र बोस अशा सर्व स्वातंत्र्य वीरांना माझे त्रिवार वंदन.

आजही आपल्या देशाच्या सीमेवर आपले जवान डोळ्यात तेल घालून खडा पहारा देतात. वेळेवर आपल्या दुष्मानांशी लडता लडता वीरगती ला प्राप्त होतात. आपले जवान आपल्या देशाची आन बाण शान आहे. अशा माझ्या शूर जवानांना माझे कोटी कोटी प्रणाम.

एवढे बोलून मी माझे दोन शब्द संपवतो.

जय हिंद! जय महाराष्ट्र! जय भारत!!!

**-: समाप्त :-**

**By : https://pdfseva.com**